# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 356/2022    दिनांक : 14.09.2022

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**लोहा :-**दिनांक 13.09.2022 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **नवघरवाडी शिवारातील बसवेश्वर पुतळयाजवळ रोडवर, ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी महिला तिच्या मैत्रिणीला लघुशंका आल्याने तिने तिची स्कुटी थांबवली व रोडवर उभी असताना तेवढयात अचानक पाठीमागून मोटर सायकलवर दोघेजण तोंडाला रुमाल बांधून आले व त्यापैकी एकाने फिर्यादी महिलेच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा फिर्यादी महिलेने आरडा ओरड केली असता फिर्यादीची मैत्रिण रोडवर पळत आल्याने ते दोघेजण पळून गेले. फिर्यादी महिला हिस यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन अंगावर पेट्रोल टाकून पेटविण्याचा व खुन करण्याचा प्रयत्न केला असावा असा संशय आहे. वगैरे **फिर्यादी सुरेखा बळीराम भालेराव, वय 37 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. अशोक मुखेड ता. मुखेड जि. नांदेड ह.मु. मस्के वस्ती आळंदी रोड पुणे** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 182/2022 कलम 307,34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री शेख साहेब, मो. नं. 8888822811** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :-

**अर्धापूर :-** दिनांक 13.09.2022 रोजी 01.30 वा. चे सुमारास, **वसमत अर्धापूर रोडवर शंभो हॉटेल धामदरी शिवारात ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयाने हॉटेलचे लोखंडी दरवाजाचे कडी कोंडा व कुलूप तोडून आत प्रवेश करून पाण्याचे जार, गॅस सिलेंडर, मॅट व इतर सामान एकुण किंमती 25,000/-रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी साहेबराव बालाजी कदम वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. धामदरी ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरन 273/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2202 सुर्यवंशी, मो.क्रं. 9923416178** हे करीत आहेत.

## 3)चोरी :-

**1)विमानतळ :-** दिनांक 11.09.2022 रोजी 22.00 वा. दिनांक 12.09.2022 रोजी 23.00 वा. चे दरम्यान, **आनंदनगर येथील श्री लक्ष्मी सायकल स्टोअर्सचे दरवाजा नसलेल्या वरच्या मजल्यावरील रुम मधुन, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे नमुद सायकल स्टोअर्स मधील वरच्या मजल्यावरील वेगवेगळया तीन सायकल एकुण किंमती 16,500/-रुपयाच्या कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले. तसेच सी.सी.टी.व्ही. कॅमेरा फोडून कॅमेराचे वायर तोडून अंदाजे 10,000/-रुपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी अर्णव नरोत्तम फलोर वय 36 वर्षे, व्यवसाय सायकल स्टोअर्स रा. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 314/2022 कलम 380,427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कुरुळेकर, मो.क्रं. 9923696704** हे करीत आहेत.

**2)भोकर :-** दिनांक 12.09.2022 रोजी 03.00 वा. ते 04.00 वा. चे दरम्यान, **मौजे शिवम शंकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय समोर दिवशी बु. ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने महावितरण कंपनीचे रोहित्र मधील तांब्याची तार, ऑईल, रॉड, असा एकुण किंमती 29,404/-रुपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले. तसेच तसेच रोहित्राचे 14,400/-रुपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी अमोल अशोक घाडगे वय 35 वर्षे, व्यवसाय कनिष्ठ अभियंता महावितरण शाखा किनी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 357/2022 कलम 379,427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2820 जाधव, मो.क्रं. 9823227195** हे करीत आहेत.

**3)नायगाव :-** दिनांक 12.09.2022 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **मौजे टेंभुर्णी शिवार ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने निसा एरटेल कंम्पनीचे टावरचे पावर केबल लाल व काळया रंगाचे वायर 22 मिटर चे दोन नग एकुण 44 मिटर वायर एकुण किंमती 20,000/-रुपयाचे चोरुन नेत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सुनिल गोविंदराव भेदे वय 32 वर्षे, व्यवसाय निसा एरटेल कंम्पनी सुपर वायझर रा. नरसी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरन 135/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वाघमारे, मो.क्रं. 9069618241** हे करीत आहेत.

**4)मरखेल :–** दिनांक 06.09.2022 रोजी 19.00 वा. ते दिनांक 07.09.2022 रोजी 09.00 वा. चे दरम्यान, **मौजे वझर शिवार ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे शेतात विहीरीवरील टेक्स्मो कंपनीची पाच एच पी ची मोटर व 40 फुट मोटारीचे विद्युत वायर कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी गोविंद विठ्ठल मदने वय 46 वर्षे, व्यवसाय शेती रा. वझर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरन 182/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/94 बारी, मो.क्रं. 8830564618** हे करीत आहेत.

# 4)प्रोव्हिबीशन :–

**बिलोली :–** दिनांक 13.09.2022 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घराचे अंगाणात अजनी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शिंदी किंमती 1400/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/142 भारत खंडु फंताडे, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 201/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1985 शिंदे, मो.क्र.** हे करीत आहेत.

# 5)विषारी औषधी पिऊन आत्महत्या :–

**हिमायतनगर :–** दिनांक 08.09.2022 रोजी चे 08.30 वा. चे पुर्वी, **सरकारी दवाखाना नांदेड येथे,** यातील **मयत नामे बंडु पि. गणपत राठोड, वय 45 वर्षे, रा. कौठा तांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी त्यांचे वडिलांच्या नावे असलेल्या मध्यवर्ती बँकेच्या कर्जाला कंटाळुन कोणतेतरी विषारी औषध पिल्याने त्यास उपचारकामी स. द. नांदेड येथे शरिक केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार कृष्णा बंडु राठोड, वय 19 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. कोठा तांडा ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं. 36/2022 कलम 174 सी.आर.पी.सी. कायदा प्रमाणे आ.मृ. दाखल असून **तपास सपोनि/श्री चौधरी, मो.क्र. 9764123018** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड